De-LINK योजनेतंर्गत देण्यात येणाऱ्या व्याज अनुदानातील विसंगती दूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. धोरण २०१९/प्र.क्र. १६ /टेक्स-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ०२ एप्रिल, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय, स.प.व व.विभाग, क्रमांक धोरण-२०११/प्र.क्र.३३५/टेक्स-२, दि.२ जानेवारी, २०१२
२) शासन निर्णय, स.प.व व.विभाग, क्रमांक-धोरण २०१२/प्र.क्र. १ /टेक्स-२, दि. १ मार्च, २०१२,
३) शासन निर्णय, स.प.व व.विभाग, क्रमांक-धोरण २०१२/प्र.क्र. २५७ /टेक्स-२, दि. २१ फेब्रुवारी, २०१४,

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ शासन निर्णय, दि. ०२.०१.२०१२ अन्वये जाहीर करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी संबंधित दिर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज अनुदान योजना ही शासन निर्णय दि.०१.०३.२०१२ अन्वये राज्यातील वस्त्रोद्योगांना लागू करण्यात आली आहे. सदर व्याज अनुदान योजना ही केंद्र शासनानच्या TUFS योजनेशी Link असल्यामुळे TUFS अंतर्गत नोंदणी असलेल्या वस्त्रोद्योगांनाच राज्याच्या योजनेंतर्गत लाभ देता येत होता. केंद्र शासनाच्या कोटा सिस्टीममुळे TUFS अंतर्गत राज्यातील वस्त्रोद्योगांना UID विलंबाने मिळत असल्याने असे वस्त्रोद्योग राज्य शासनाच्या वस्त्रोद्योग अनुदान योजनेपासून वंचित राहत होते.

ही परिस्थिती विचारात घेऊन राज्य शासनाने शासन निर्णय, दि.२१.०२.२०१४ नुसार राज्य शासनाची व्याज अनुदान योजना ही केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी असंलग्न (De-Link) करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शासन निर्णय दि.२१.०२.२०१४ अन्वये राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना त्यांच्या वस्त्रोद्योगाच्या प्रकारानुसार ५ टक्के ते ७ टक्के इतके व्याज अनुदान दि.२१.०२.२०१४ पासून लागू करण्यात आले. सदर अनुदान लागू करीत असताना तत्कालिन परिस्थितीतील बँकांचे कर्जावरील व्याज दर विचारात घेण्यात आले होते. तथापि आता बँकांचे कर्जावरील व्याज दर बऱ्याच अंशी कमी झाले आहेत. त्यामुळे अर्थसहाय्य करणाऱ्या बँकांना राज्य शासनाच्या व्याज अनुदान योजनेत अनुदान क्लेम सादर करण्यात अडचणी येत होत्या. त्याअनुषंगाने स्पष्टीकरण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील वस्त्रोद्योगांना अर्थसहाय्य करणाऱ्या बँकांनी शासन निर्णय दि. २१/०२/२०१४ नुसार व्याज अनुदानाची मागणी (Claims) सादर करताना खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) शासन निर्णय दि.२१.०२.२०१४ अन्वये De-LINK योजनेंतर्गत निश्चित केलेले व्याज अनुदानाचे ५ टक्के, ६ टक्के व ७ टक्के या निश्चित दराने अनुदान न देता, हे दर बँकांनी त्या कर्जावर प्रत्यक्ष आकारलेला व्याजदर (Actual Rate of Interest) किंवा १२.५०% किंवा PLR किंवा Base Rate यापैकी जो कमी दर असेल तो विचारात घेवून त्यामधून केंद्र शासनाने दिलेले/देय्य असलेले व्याज वजा करून उर्वरित व्याजाची मागणी वस्त्रोद्योगाच्या प्रकारानुसार कमाल ५ टक्के, ६ टक्के व ७ टक्के या मर्यादेत व्याज अनुदानाचे क्लेम सादर करावेत. त्यानुसार खालील तक्त्यात नमुद केलेले व्याजदरानुसार अनुदान परिगणीत करून बँकांनी वस्त्रोद्योग प्रकल्पांचे व्याज अनुदानाचे क्लेम सादर करावेत.

क्र	वस्त्रोद्योग घटकांचा प्रकार	अनुज्ञेय व्याजदर
१.	सुतगिरणी, गारमेंटींग, जिनींग-प्रेसींग आणि प्रोसेसिंग	कर्जावर प्रत्यक्ष आकारलेला व्याजदर (Actual Rate of Interest) किंवा १२.५०% किंवा PLR किंवा Base Rate यापैकी जो कमी असेल तो व्याजदर विचारात घेऊन त्यातून केंद्र शासनाचे व्याज अनुदान वजा करून उर्वरीत व्याज दर **किंवा ७% यापैकी जो कमी असेल तो दर**
२.	टेक्निकल टेक्सटाईल	कर्जावर प्रत्यक्ष आकारलेला व्याजदर (Actual Rate of Interest) किंवा १२.५०% किंवा PLR किंवा Base Rate यापैकी जो कमी असेल तो व्याजदर विचारात घेऊन त्यातून केंद्र शासनाचे व्याज अनुदान वजा करून उर्वरीत व्याजदर **किंवा ६% यापैकी जो कमी असेल तो दर**
३.	कंपोझिट युनिट	कर्जावर प्रत्यक्ष आकारलेला व्याजदर (Actual Rate of Interest) किंवा १२.५०% किंवा PLR किंवा Base Rate यापैकी जो कमी असेल तो व्याजदर विचारात घेऊन त्यातून केंद्र शासनाचे व्याज अनुदान वजा करून उर्वरीत व्याजदर **किंवा ६% यापैकी जो कमी असेल तो दर**
४.	वरील अनुक्रमांक १, २ व ३ व्यतिरीक्त अन्य वस्त्रोद्योग	कर्जावर प्रत्यक्ष आकारलेला व्याजदर (Actual Rate of Interest) किंवा १२.५०% किंवा PLR किंवा Base Rate यापैकी जो कमी असेल तो व्याजदर विचारात घेऊन त्यातून केंद्र शासनाचे व्याज अनुदान वजा करून उर्वरीत व्याजदर **किंवा ५% यापैकी जो कमी असेल तो दर**

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०४०२१४५८४३९७०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2019.04.02 15:03:17 +05'30'

(आ.अ.लोपिस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : -

१) मा.राज्यपालांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,महाराष्ट्र राज्य
३) मा. मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई
६) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

७) महाराष्ट्र राज्यातील सर्व मा.खासदार
८) मा.आमदार (सर्व)
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०) सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
११) संचालक, (वस्त्रोद्योग) वस्त्रोद्योग संचालनालय, म.रा.नागपूर
१२) संचालक (रेशीम) रेशीम संचालनालय, म. रा. नागपूर
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४) महालेखापाल, (लेखा व लेखा अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई, नागपूर
१५) संबंधित बँका-TUFS Cell
१६) निवड नस्ती (टेक्स-५).